महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे
२८, राणीचा बाग , जुने सर्किट हाउस जवळ , पुणे ४११००१
दूरध्वनी: ०२० -२६३६०९४१, २६३६२७७२

**योजनेचे नाव : महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना एक वर्ष कालावधी मध्ये नामवंत खाजगी शिक्षण संस्थेच्या साह्याने ऑनलाईन स्वरुपात टॅबच्या माध्यमातून मेडिकल (NEET) व अभियांत्रिकी (JEE) प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करणे योजना**

**योजनेचा उद्देश व स्वरूप :**

महाराष्ट्र राज्यामध्ये कोविड- १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने सध्या सर्व शाळा, महाविद्यालयातील प्रशिक्षण तसेच शिक्षण संस्थेतील सुरु असलेले सर्व कामकाज स्थगित आहे. परंतू संघ व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत कोविड पूर्व प्रकाशित झालेल्या नोकरी विषयक जाहिरातीच्या अनुषंगाने विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे (उमेदवारांचे ) शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना बारा महिने कालावधीमध्ये टॅब द्वारे ऑनलाईन स्वरुपात (NEET) व अभियांत्रिकी (JEE) प्रवेश परीक्षांचे मार्गदशन केले जाणार आहे

**विद्यार्थी निवड प्रक्रिया :**

सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी योग्य व पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची / उमेदवारांची निवड त्यांना दहावी, अकरावी व बारावी, या परीक्षेमध्ये प्राप्त असलेल्या गुणांस (Weightage) भारांक नुसार गुण दिले जातील व गुणानुक्रमे निवड यादी तयार केली जाईल. एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

निवड यादी तयार करणेसाठी उमेदवारांच्या प्राप्त गुणांना खालीलप्रमाणे भारांक (Weightage) दिले जाईल.

| वर्ग | भारांक |
|---|---|
| दहावी | ६० टक्के |
| अकरावी किंवा बारावी | ४० टक्के |
| एकूण | १०० टक्के |

जर उमेदवार बारावी ( H.S.C.) उत्तीर्ण असेल तर अकरावी व बारावी या इयत्तामधील ज्या वर्गास ( इयत्ता ) मध्ये जास्त गुण प्राप्त आहेत ते वर्ष गुणवत्ता यादी तयार करणे साठी विचारात घेतले जाईल.

सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी व अंमलबजावणी त काही अडचणी आल्यास उचित बदल करून त्यास मान्यता देण्याचे अंतिम अधिकार मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना असतील.

**उमेदवाराची सर्व साधारण पात्रता:**

i) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी /अधिवासी असला पाहिजे.
ii) उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे आवश्यक
iii) प्रशिक्षणासाठी उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.
iv) उमेदवारांच्या कुटुंबाचे सन २०२० -२१ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न रु. ८ लक्ष पेक्षा कमी असावे
v) प्रशिक्षणासाठी निवड करण्यासाठी उमेदवाराने अरेरावी, राजकीय व नोकरशाही दबावतंत्राचा वापर केल्यास त्याची उमेदवारी रद्द होईल.
vi) विद्यार्थ्याने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
vii) दिव्यांग व्यक्ती आणि महिला यांच्यासाठी नियमानुसार आरक्षण देण्यात येईल.

**कागदपत्राची यादी :**

१. विहित नमुना मध्ये संपूर्ण भरलेला अर्ज, त्यावर रंगीत सध्याचा फोटो असावा.
२. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत
३. अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र साक्षांकित प्रत
४. दहावी (S.S.C.) मूळ गुणपत्र स्कॅन प्रत व मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
५. अकरावी मूळ गुणपत्र स्कॅन प्रत
६. बारावी (H.S.C.) मूळ गुणपत्र स्कॅन प्रत व मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
७. मूळ डोमिसाईल प्रमाणपत्र स्कॅन प्रत
८. मूळ आधारकार्ड मूळ स्कॅन प्रत
९. तहसीलदार यांनी दिलेला सेतू मूळ उत्पन्नाचा दाखला स्कॅन प्रत

**महत्वाची सूचना :**

सदर लाभासाठीचे अर्ज http://trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेल्या गुगल फॉर्म च्या लिंक वरूनच करावेत. सदर लाभाकरिता कोणत्याही इमेल आय. डी. वर अर्ज पाठवून नयेत, अशा पाठविलेल्या कोणत्याही अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

( डॉ. राजेंद्र भारुड भा.प्र.से. )
आयुक्त